# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(ब-१) अन्वये आदेश

२५५८

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/कारगीलहौ/क.७७(अ)/ /२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. ठाणे
दिनांक :- १९/०९/२०१७

वाचले :- १) श्री.पिटर म.लोपीस,सदनिका क्र.२-जी,कारगील विजय,को.ऑप.हौसिंग सोसा.लि.यांचेकडील दिनांक २५/०४/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज.
२) या कार्यालयाचे दिनांक ०९/०६/२०१७ चे पत्र.
३) अध्यक्ष/सचिव, ,कारगील विजय,को.ऑप.हौसिंग सोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) यांचेकडील दिनांक १६/६/२०१७ रोजीचे पत्र.
४) श्रीमती गीता रणजित जैन,समिती सभासद, ,कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि. ब-हामपूर,स्टेला,वसई (प) यांचेकडील दिनांक १७/४/२०१७ रोजीचे राजीनामा पत्र.
५) श्री. अमोल पाटील, कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) यांचेकडील दिनांक १७/४/२०१७ रोजीचे राजीनामा पत्र.
६) या कार्यालयाकडील जा.क्र.उपनि/वसई/बी-१/कारगीलविजयहौ/क.७७अ/११६८/१७ दि.०७/७/२०१७ ची कारणे दाखवा नोटीस.
७) अध्यक्ष/सचिव, ,कारगील विजय,को.ऑप.हौसिंग सोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) यांचेकडील दिनांक १७/०८/२०१७ रोजीचे पत्र.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील तरतुद.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई
वसई तालुका वसई

ज्याअर्थी, कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते,आणि,

ज्याअर्थी, श्री.पिटर म.लोपीस,सदनिका क्र.२-जी,कारगील विजय,को.ऑप.हौसिंग सोसा.लि यांनी संस्थेची समिती अल्पमतात आल्याबाबत या कार्यालयाकडे केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक २ च्या पत्राने संस्थेस आवश्यक तो खुलासा सादर करणेबाबत कळविण्यांत आलेले आहे. संस्थेने संदर्भ क्रमांक ३ चे पत्राने याबाबत खुलासा सादर केलेला आहे.संस्थेची संचालक मंडळ निवडणूक दिनांक ०१/११/२०१५ रोजी झालेली असून सदर निवडणूकीमध्ये १० संचालक मंडळावर अविरोध निवडून आलेले आहेत. पैकी १. श्री.मुरलीधर सुरुशे,२.श्री.वसंत चौधरी,३.श्री.पिटर लोपीस,४.श्री.उदय शं.सुतार यांनी त्यांच्या संचालक पदाचा राजीनामा दिलेला आहे.तरी संस्थेतील दोन सभासदांना संचालक म्हणून स्विकृत करुन घेण्यांस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. उपरोक्त नमूद चार संचालका व्यतिरिक्त श्रीमती गीता रणजित जैन व श्री.अमोल पाटील यांनी त्यांच्या संचालक पदाचा राजीनाता दिल्याचे दिसून येत आहे. संचालक मंडळावरील एकूण १० संचालकापैकी ०६ संचालकांनी त्यांच्या पदाचे राजीनामे दिल्याचे दिसून येत आहे.आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी संस्थेच्या समितीवर एकूण १० समिती सदस्यांपैकी ६ सदस्यांनी त्यांच्या पदांचे राजीनामे दिल्याने संस्थेची समिती अल्पमतात आल्याचे सकृत दर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे संस्था समिती अल्पमतात आल्याने संस्थेची समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक का करण्यांत येवू नये याबाबतचा संदर्भ क्रमांक ६ अन्वये संस्थेस कारणेदाखवा नोटीस निर्गमित करण्यांत आली होती.सदर नोटीसीचे अनुषंगाने संस्थेने संदर्भ क्रमांक ७ अन्वये सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता संस्थेने सदरची बाब मान्य करुन संस्थेची समिती बरखास्त करणेबाबत विनंती केली आहे.आणि

त्याअर्थी कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) ता.वसई जि.पालघर सस्थेवर सद्यस्थितीत संचालक मंडळ कार्यरत नसल्याबाबत माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(ब-१) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, सुरेश अंधारे, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई कारगील विजय,को.ऑप.हौसिंग सोसा .लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) ता.वसई जि.पालघर या संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करून त्याठिकाणी श्री.सी.एस.पाटिल, निवृत्त सहकारी अधिकारी श्रेणी-१ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. व संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. १९/०९/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

उप-निबंधक, सहकारी संस्था, वसई

( सुरेश अंधारे )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रत,

१. श्री. चंद्रकांत शां.पाटील,निवृत्त सहकारी अधिकारी श्रेणी-१ तथा प्राधिकृत अधिकारी कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) ता.वसई जि.पालघर

२. अध्यक्ष/सचिव, कारगील विजय,को.ऑप.हौसिंगसोसा.लि.ब-हामपूर,स्टेला,वसई (प) ता.वसई जि.पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Scanned by CamScanner